**अपर जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

शासन आदेश, क्र. पदोन्नती-०१/२०२०/प्र.क्र.१/२०२०/ई-१,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**दिनांक : ३० एप्रिल, २०२०.**

**संदर्भ** :- १) शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. पदोन्नती-०१/२०२०/प्र.क्र.१/२०२०/ई-१, दि. ३०.०१.२०२०.

२) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दि.२८.४.२०१५

३) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दि. १६.०७.२०१५

४) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या.१२, दि.१५.०६.२०१७.

५) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. ईएसबी ११२०/प्र.क्र.८/१३, दि.२९.०१.२०२०

**शासन आदेश :-**

संदर्भाधीन क्र. १ येथील नमूद दि.३०.०१.२०२० च्या शासन आदेशान्वये उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (गट अ) (वेतनश्रेणी एस-२३ ₹६७,७००-२,०८,७००) या संवर्गातील खालील तक्त्यात नमुद केलेल्या अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी- एस २५- रू.७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गात, सदर शासन आदेशातील परिच्छेद क्र.४ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून, तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच, 'महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबत संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील नमूद शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.२८.०४.२०१५ व दि. १६.०७.२०१५ आणि संदर्भाधीन क्र.४ येथील नमूद शासन अधिसूचना, दि. १५.०६.२०१७ मधील तरतुदी विचारात घेऊन तदर्थ पदोन्नती देण्यात आलेल्या सदर अधिकाऱ्यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने खालील तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मध्ये मंजूर झालेला महसूली संवर्ग विभाग कायम ठेऊन स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविल्यानुसार तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे. :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | ज्येष्ठता क्रमांक | प्रवर्ग | मंजूर महसूली संवर्ग विभाग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | **श्री. सुरज रोहिदास वाघमारे** | **०४/२००१** | **अ.जा.** | **नागपूर** | **अपर महासंचालक, महाऊर्जा, पुणे या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती.** |



Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | श्री. राजेंद्र सुरेश मुठे | १७/२००१ | खुला | नागपूर | उपायुक्त, महापालिका, पुणे या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती. |
| ३ | श्री. अजिंक्य नाथा पडवळ | ३०/२००१ | खुला | नागपूर | अपर जिल्हाधिकारी, सिडको महामंडळ या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती. |
| ४ | श्रीमती वैशाली नंदकिशोर इंदाणी-उंटवाल | ४४/२००१ | इ.मा.व. | नागपूर | सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती. |
| ५ | श्री. धनंजय ज्ञानदेव सावळकर | ४८/२००१ | भ.ज.(क) | औरंगाबाद | सह संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती. |
| ६ | श्रीमती मायादेवी हंबीरराव पाटोळे | ५०/२००१ | भ.ज.(क) | नाशिक | महाव्यवस्थापक, (पुनर्वसन व पूर्वसाहत), मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई या सध्या कार्यरत असलेल्या पदावर प्रपत्र पदोन्नती. |

२. राज्यातील कोरोना संसर्ग रोखण्याविषयीच्या कामकाजाबाबतचे गांभीर्य, तातडीची निकड व अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर आदेशातील उक्त अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी,स्वीयेतर सेवा आणि निलंबन ,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ४०, परिशिष्ट-२ , अट क्र.१८ अनुसार सध्याच्या प्रतिनियुक्तीच्या पदावर **प्रपत्र पदोन्नती** देण्यात आली असून त्यांचा सदर पदावरील कालावधी सहा महिन्यांसाठी असेल. प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होणेसाठी संबंधीत अधिकाऱ्यांच्या सेवा संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात येत असून संबंधीत अधिकाऱ्यांनी त्या विभागाच्या सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव यांचेकडे हजर व्हावे.

४. सदरहु तदर्थ पदोन्नत्या ह्या अपर जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गाच्या वित्त विभागाच्या मान्यतेने मंजूर होणाऱ्या सुधारीत आकृतीबंध निश्चितीच्या अधीन राहतील.

Scanned with CamScanner

५. अपर जिल्हाधिकारी या संवर्गात पदोन्नत झालेल्या उक्त अधिकारी यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होऊन कार्यभार स्वीकारल्यानंतरच त्यांना अपर जिल्हाधिकारी (वेतनश्रेणी- एस २५- रू.७८,८००-२,०९,२००/-) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय होतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,**

(डॉ. माधव वीर)
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (न.वि.-१/२), मंत्रालय, मुंबई-३२.
४) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

**प्रत,**

१) मा.राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
३) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
४) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
७) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
८) सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ४०००२१,
९) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन २१),मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
१०) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ मुंबई / नागपूर,
११) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
१२) व्यवस्थापकीय संचालक, सिडको महामंडळ, नवी मुंबई.
१३) आयुक्त, महानगरपालिका, पुणे
१४) संबंधित विभागीय आयुक्त.
१५) महासंचालक, महाऊर्जा, पुणे
१६) व्यवस्थापकीय संचालक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
१७) संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८) व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई
१९) संबंधित जिल्हाधिकारी.
२०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
२१) उप सचिव (कार्यासन १३), सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई ४०० ०३२,
२२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २ मुंबई / नागपूर,
२३) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई / नागपूर,
२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२५) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
२६) संबंधित अपर जिल्हाधिकारी, (संबंधित कार्यरत असलेल्या कार्यालयामार्फत)
२७) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन -१२/१३), मंत्रालय, मुंबई ४०००३२,
२८) उप सचिव (कार्यासन ई-१) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
२९) महसूल व वन विभाग कार्यासन ई-२ व ई-४, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
३०) निवड नस्ती-कार्यासन ई-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.



Scanned with CamScanner